कृषि क्षेत्रात नावीन्यपूर्ण तंत्रज्ञानाचा विकास व वापराला चालना देण्यासाठी "राज्यस्तरीय ॲग्री हॅकेथॉन" स्पर्धा नियमितपणे आयोजित करण्याबाबत....

महाराष्ट्र शासन
कृषी विभाग
शासन निर्णय क्रमांक : अेआय-२०२६/प्र.क्र.१७३/१३-अे
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मंत्रालय विस्तार, मुंबई ४०० ०३२
दिनांक:- १७ जुलै, २०२६

प्रस्तावना :-

कृषि क्षेत्रातील विविध आव्हानांवर व समस्यांवर मात करण्यासाठी आधुनिक व प्रगत तंत्रज्ञानाचा (Innovations & AI) विकास व प्रभावी वापर करणे अत्यंत आवश्यक आहे. कृषि क्षेत्रातील नवतंत्रज्ञानास प्रोत्साहन देण्याकरिता यापूर्वी जून २०२५ व मे २०२६ मध्ये पुणे येथे ॲग्री हॅकेथॉन स्पर्धेचे यशस्वी आयोजन करण्यात आले होते. मा. मुख्यमंत्री महोदयांनी केलेल्या घोषणेनुसार आता या स्पर्धेचा विस्तार करून ती "राज्यस्तरीय ॲग्री हॅकेथॉन" म्हणून प्रतिवर्षी आयोजित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय:-

कृषि विभाग व संबंधित भागधारकांच्या सहकार्याने "राज्यस्तरीय ॲग्री हॅकेथॉन"या स्पर्धेचे प्रति वर्षी नियमितपणे आयोजन करण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. स्पर्धेची उद्दिष्ट्ये:

अ) कृषि क्षेत्रातील नवीन तंत्रज्ञानास (Innovations) व स्टार्ट-अप्सना प्रोत्साहन देणे.

आ) कृषि क्षेत्रात येणाऱ्या विविध समस्या सोडवण्यासाठी आधुनिक तंत्रज्ञानाच्या सहाय्याने उपाययोजना करणे.

इ) हे नवीन तंत्रज्ञान शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवून त्याच्या व्यापक उत्पादन (Scalability) व वापरास चालना देणे.

ई) राज्यातील प्रमुख शहरांना नावीन्यपूर्ण कृषि तंत्रज्ञान प्रसाराचे (Innovative Technologies) केंद्र म्हणून विकसित करणे.

३. स्पर्धेची कार्यपद्धती व आयोजन कालावधी:

अ) समस्या निश्चिती (Problem Statements): कृषि आयुक्तालयामार्फत सर्व संबंधित भागधारकांशी (Stakeholders) सविस्तर चर्चा व विचारविनिमय करून कृषि क्षेत्रातील अडचणींवर आधारित दर वर्षी कमाल १० समस्या निश्चित केल्या जातील.

आ) आयोजनाचा कालावधी : हॅकेथॉनमधून निवड झालेल्या नवीन तंत्रज्ञानाची प्रत्यक्ष शेतात 'खरीप हंगामात' चाचणी घेता येणे शक्य व्हावे, या अनुषंगाने निवडी पश्चात अंमलबाजवणीचे सर्व नियोजन करण्याच्या दृष्टीने सदर स्पर्धेचे आयोजन शक्यतो जानेवारी-फेब्रुवारी महिन्यामध्ये करण्यात यावे.

इ) चक्राकार पद्धती : राज्यातील सर्व भौगोलिक व कृषि-हवामान विभागांना समान संधी मिळण्यासाठी सदर स्पर्धेचे आयोजन राज्यातील ४ राज्य कृषि विद्यापीठांच्या कार्यक्षेत्रात प्रतिवर्षी चक्राकार पद्धतीने खालील स्थळांवर आयोजित केले जाईल:

- महात्मा फुले कृषि विद्यापीठ, राहुरी (अंतर्गत आयोजन स्थळ: पुणे)
- डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला (अंतर्गत आयोजन स्थळ: नागपूर)
- वसंतराव नाईक मराठवाडा कृषि विद्यापीठ, परभणी (अंतर्गत आयोजन स्थळ: छत्रपती संभाजीनगर)
- डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली (अंतर्गत आयोजन स्थळ: ठाणे अथवा अन्य सोयीचे ठिकाण)

४. पारितोषिके व बक्षिसांचे स्वरूप:

अ) निश्चित केलेल्या प्रत्येक समस्येसाठी १ विजेता व १ उपविजेता निवडण्यात येईल.

आ) प्रत्येक समस्येसाठी निवडलेल्या विजेत्यास रुपये २५ लाख आणि उपविजेत्यास रुपये १५ लाख पारितोषिक देण्यात येईल.

इ) विजेत्यांमधून ज्यूरी पॅनेलद्वारे निवडलेल्या सर्वश्रेष्ठ विजेत्यास मा. मुख्यमंत्री महोदयांच्या घोषणेनुसार दिवंगत उपमुख्यमंत्री ना.मा.श्री. अजित पवार यांच्या नावाने पहिला मुख्य पुरस्कार देऊन गौरविण्यात येईल.

ई) विजेत्या व उपविजेत्यांना पारितोषिकाची रक्कम प्रकल्पाच्या टप्पे निहाय अदा करण्यात यावी. प्रत्येक प्रकल्पाचे टप्पे निश्चितीची कार्यवाही ज्यूरी पॅनलद्वारे प्रकल्प मंजूरीवेळीच करण्यात यावी.

उ) सदर मंजूर प्रकल्पाच्या तंत्रज्ञानाची छाननी कृषि विद्यापीठामार्फत करण्यात यावी.

५. सहभाग व तांत्रिक साहाय्य:

अ) सदर राज्यस्तरीय हॅकेथॉनमधील सहभाग हा पूर्णपणे खुला व सर्वसमावेशक असेल. खाजगी क्षेत्रातील सर्व संबंधित भागधारक, उद्योजक व व्यावसायिक, संशोधन संस्था, स्टार्ट-अप्स, नवसंशोधक (Innovators), विद्यार्थी, अभियंते व कृषि शास्त्रज्ञ यामध्ये सहभागी होऊ शकतील.

आ) सहभागी स्पर्धकांसाठी सविस्तर नियमावली कृषि आयुक्तालयाच्या संनियंत्रण समितीकडून निश्चित केली जाईल.

६. निधीची उपलब्धता व आर्थिक तरतूद:

अ) पारितोषिक खर्च: स्पर्धकांसाठीच्या पारितोषिकांच्या रकमेचा संपूर्ण खर्च राज्य शासनामार्फत महाकृषि कृत्रिम बुद्धिमत्ता योजनेंतर्गत उपलब्ध तरतुदीतून करण्यात येईल.

आ) आयोजन खर्च: स्पर्धा आयोजित करणे, तिची अंमलबजावणी करणे आणि इतर अनुषंगिक खर्च संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हा नियोजन समिती (DPDC) निधीमधून उपलब्ध करून दिलेल्या तरतुदीतून करण्यात येईल.

७. अंमलबजावणी व जबाबदारी:

राज्यस्तरीय ॲग्री हॅकेथॉनच्या संपूर्ण आयोजनाची, नियोजनाची आणि यशस्वी अंमलबजावणीची प्राथमिक जबाबदारी कृषि आयुक्तालय, पुणे येथील संचालक (नियोजन) आणि स्पर्धा आयोजन केल्या जाणाऱ्या मुख्यालयाच्या ठिकाणी नियुक्त जिल्हाधिकाऱ्यांकडे राहील.

८. जिल्हास्तरीय आयोजन समिती :

जिल्हास्तरावर जिल्हाधिकारी, यांचे अध्यक्षतेखाली स्पर्धेची आखणी व अंमलबजावणी करण्याकरिता जिल्हास्तरीय आयोजन समिती असेल. या समितीची रचना पुढीलप्रमाणे असेल.

अधिकारी	पद
जिल्हाधिकारी, संबंधित	अध्यक्ष
मुख्य कार्यकारी अधिकारी, संबंधित	सदस्य
सहयोगी अधिष्ठाता, कृषि महाविद्यालय, संबंधित	सदस्य
प्रकल्प संचालक, आत्मा, संबंधित	सदस्य
जिल्हा कौशल्य विकास अधिकारी, संबंधित	सदस्य
प्रतिनिधी, प्रादेशिक उद्योजक संस्था	सदस्य
प्रतिनिधी, स्थानिक औद्योगिक संघटना	सदस्य
प्रतिनिधी, कृषि विज्ञान केंद्र, संबंधित	सदस्य
जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, संबंधित	सदस्य सचिव

जिल्हास्तरीय समितीची कार्ये व जबाबदा-या :

- सदर समिती ॲग्री हॅकेथॉन स्पर्धेची प्रत्यक्ष अंमलबजावणी करेल.
- सदर समिती स्पर्धेचे वेळापत्रक अंतिम करेल.
- आयोजनामध्ये सहभागी विविध अशासकीय संस्थांना सूचना निर्गमीत करणे.
- स्पर्धा आयोजनाकरिता विविध शासकीय विभागांमध्ये समन्वय ठेवणे.
- स्पर्धेचे मूल्यमापन करणे व विजेते जाहीर करणे.
- समितीच्या बैठका आवश्यकतेनुसार घेण्यात येतील.

९. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.inया संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०७१७१७३०२६४६४६ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

LALITKUMAR
RANGNATH DHAYGUDE

Digitally signed by LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Agriculture and Adf Dept, 2.5.4.20=77EE43FEB646B7AE43865425CA1D67A75CD7607FAEAE62A4E9BAD488155D6D28, postalCode=400032, st=Maharashtra, serialNumber=84E88A84C7D5FA8833BA5D3A151CAF394D94599C220A07BDD761A398EED0AC3E, cn=LALITKUMAR RANGNATH DHAYGUDE
Date: 2026.07.17 17:32:14 +05'30'

(डॉ. ललितकुमार रं. धायगुडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन, मलबार हिल, मुंबई.
२) मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई.
३) मा. मंत्री (कृषि) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा. मुख्य सचिव, महाराष्ट्र राज्य.
५) सचिव (कृषि), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
६) आयुक्त (कृषि), महाराष्ट्र राज्य, पुणे.
७) व्यवस्थापकीय संचालक, कृत्रिम बुद्धिमत्ता व ॲग्रिटेक नाविन्यता केंद्र (AIAIC), मुंबई.
८) सर्व संचालक, कृषि आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
९) सर्व विभागीय कृषि सहसंचालक
१०) सर्व जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी
११) वित्त विभाग (व्यय-१) , मंत्रालय, मुंबई.
१२) कार्यासन (२-अे), कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
१३) निवड नस्ती (कार्यासन १३-अे) कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.